• वर्ष : ०३ • अंक : २९० • पुणे • रविवार, दि. १२ जुलै २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



# दिवे घाटात माऊली थाटात

## टाळ-मृदंगांच्या गजरात पालखी सोहळ्याचे पंढरीकडे प्रस्थान

**पुणे (दै. आरंभ पर्व) "ज्ञानोबा माउली तुकाराम"च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदंगांच्या निनादात आणि हरिनामाच्या अखंड गजरात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याने शनिवारी पहाटे पुणेकरांचा भावपूर्ण निरोप घेत पंढरीच्या दिशेने प्रस्थान केले. पुणेकरांनी केलेल्या सेवाभावाने आणि भक्तिमय वातावरणाने भारावलेल्या लाखो वारकऱ्यांनी विठ्ठलनामाचा गजर करत पायी प्रवास सुरू ठेवला.**

इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे यंदा आळंदी आणि देहू येथे गर्दी न करता पुण्यातूनच पालखी सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासन आणि पालखी सोहळा समितीने केले होते. त्याला वारकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे आधीपासून पुण्यात मुक्कामी असलेले वारकरी पहाटेपासूनच पालखीसोबत मार्गक्रमणासाठी सज्ज झाले.

भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांची, तर नाना पेठेतील निवडुंगा विठोबा मंदिरात संत तुकाराम महाराजांच्या पादुकांची नित्यपूजा, अभिषेक आणि आरती झाल्यानंतर पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात दिंड्या पुढे सरकू लागल्या. अनेक दिवसांच्या मुक्कामानंतर नव्या उत्साहाने भारावलेल्या वारकऱ्यांनी भजन, कीर्तन आणि फुगड्यांच्या तालावर आनंदोत्सव साजरा करत पुढील प्रवासाला सुरुवात केली.




### दिवे घाटात भक्तीचा महासागर

दिवे घाटातील वळणावळणाच्या रस्त्यावरून पुढे सरकणाऱ्या लाखो वारकऱ्यांचे दृश्य यंदाही अविस्मरणीय ठरले. हिरव्यागार डोंगररांगांच्या साक्षीने "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड नामघोषात संपूर्ण घाट दुमदुमून गेला. डोळ्यांचे पारणे फेडणारा हा भक्तिसोहळा पाहण्यासाठी हजारो भाविकांनी घाट परिसरात गर्दी केली. पालखीचे विहंगम दर्शन आणि वारकऱ्यांच्या शिस्तबद्ध दिंड्यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा पुन्हा एकदा भव्य आविष्कार घडविला.

रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात वारकऱ्यांचे स्वागत केले. अनेक ठिकाणी पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. ढगाळ वातावरण, आल्हाददायक गारवा आणि भागवत एकादशीच्या पवित्र सकाळी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

हडपसरपर्यंत दोन्ही पालख्या एकत्र मार्गक्रमण केल्यानंतर गाडीतळ येथे दोन्ही पालख्यांचे मार्ग वेगळे झाले. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी दिवे घाटातील अवघड चढ पार करून संत सोपानदेवांच्या सासवड नगरीत मुक्कामी पोहोचली, तर जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी सोलापूर महामार्गाने लोणी काळभोरकडे प्रस्थान झाली.

एकादशीचे औचित्य साधत विविध सामाजिक संस्था, गणेश मंडळे, स्वयंसेवी संघटना तसेच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी वारकऱ्यांसाठी सेवा उपक्रम राबविले. साबुदाणा खिचडी, केळी, राजगिऱ्याचे व शेंगदाण्याचे लाडू, चहा आणि पिण्याचे पाणी यांचे वाटप करण्यात आले. भैरोबानाला येथे न्याहारी, तर गाडीतळ येथे भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

धनकवडी येथील श्री सद्गुरू शंकर महाराज भजनी मंडळाच्या वतीने वारकऱ्यांना रेनकोट आणि न्याहारीचे वाटप करण्यात आले. निखिल वाघमारे आणि चिन्मय भदे यांनी या उपक्रमाचे नियोजन केले. तसेच बीएसएनएल एम्प्लॉइज युनियनच्या वतीने प्लास्टिकच्या घोंगड्यांचे वितरण करण्यात आले. या सेवाकार्यात किशोर गवळी, नागेश नलावडे, युसुफ जकाती, गणेश भोज, वृषाली दाभोळकर, बबन सूर्यवंशी, विकास कदम, सुनील सोनवणे, दिलीप मगर, मधुकर कामठे, रोहिणी कुलकर्णी आणि पुष्पा फराटे यांचा सहभाग होता.

संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवड येथे मुक्कामी पोहोचल्यानंतर रविवारी (१३ जुलै) सकाळी संत सोपानदेव महाराजांच्या पालखीसह पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासाला प्रारंभ होणार आहे.



## लोणी काळभोरकडे तुकोबांची वाटचाल – पुणेकरांचा भावपूर्ण निरोप, सेवाभावाने वारकरी भारावले

# कदमवाकवस्ती-लोणी काळभोर येथे संत तुकाराम महाराज पालखीचे भव्य स्वागत

### पुष्पवृष्टी, हरिनामाचा गजर आणि भक्तीच्या जल्लोषात तीन लाख वारकऱ्यांचा मुक्काम; प्रशासनाची चोख व्यवस्था

**लोणी काळभोर-चंद्रकांत दुंडे (दै. आरंभ पर्व)**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे पुणे शहरातील दोन दिवसांचा मुक्काम पूर्ण करून ग्रामीण भागातील पहिल्या मुक्कामस्थळी म्हणजेच कदमवाकवस्ती (लोणी काळभोर) येथे शनिवारी सायंकाळी भक्तिभावाने आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. पालखीचे आगमन होताच भाविकांनी पुष्पवृष्टी करत "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात वातावरण भक्तिमय केले. सायंकाळी सुमारे ६.३० वाजता पालखी सोहळा पालखी तळावर मुक्कामी विसावला.

पुणेकरांनी भावपूर्ण निरोप दिल्यानंतर सोलापूर महामार्गाने मार्गक्रमण करत आलेल्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंगांच्या सुरात आणि हरिनामाच्या अखंड घोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. काही वारकरी फुगड्या खेळत होते, तर काहींनी मानवी मनोरे उभारून भागवत धर्माची पताका उंचावत भक्तीचा उत्सव साजरा केला.

पालखी सोहळ्यात यंदा ४०० दिंड्या सहभागी असून, पालखीच्या पुढे १६ दिंड्या तर मागे ३८४ दिंड्या मार्गक्रमण करत आहेत. या सोहळ्यात सुमारे तीन लाख वारकरी सहभागी झाल्याची माहिती पालखी सोहळा अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, सोहळा प्रमुख विक्रमसिंह महाराज मोरे, अभिजित महाराज मोरे, गणेश महाराज मोरे आणि विश्वस्त दिलीप महाराज मोरे यांनी दिली. लोणी काळभोर येथील कदमवाकवस्ती परिसरातील सुमारे १६ एकर जागेवर पालखी तळ उभारण्यात आला आहे. मागील पंधरा दिवसांपासून महसूल, ग्रामपंचायत, पोलीस, आरोग्य, महावितरण आणि इतर विभागांनी व्यापक तयारी केली होती. वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, तातडीच्या उपचारांसाठी रुग्णवाहिका, फिरती शौचालये, सीसीटीव्ही देखरेख, तसेच १५ हजार चौरस फुटांचा जर्मन तंबू उभारण्यात आला. त्यामुळे लाखो वारकऱ्यांच्या मुक्कामासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

लोणी काळभोर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहकार्याने वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली. पूर्व हवेली डॉक्टर असोसिएशनच्या वतीने डोळ्यांची आणि सर्वसाधारण आरोग्य तपासणी करून मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. मार्गावरील विविध संस्था, मंडळे आणि स्वयंसेवी संघटनांनी वारकऱ्यांना खाद्यपदार्थ, पिण्याचे पाणी आणि अल्पोपहाराचे वाटप केले.



### आमदार माऊली कटके यांच्याकडून स्वागत

कवडीपाट येथे शिरूर-हवेलीचे आमदार माऊली कटके यांनी पालखीचे स्वागत केले. पालखी तळावर आगमनानंतर आरती करण्यात आली. यावेळी हवेलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार तृप्ती कोलते, सभापती युवराज काकडे, जिल्हा परिषद सदस्या शितल कांबळे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत पदाधिकारी, महसूल अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महावितरणकडून अखंड वीजपुरवठ्याची व्यवस्था

लोणी काळभोर महावितरणचे सहाय्यक अभियंता विक्रांत ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी पालखी मुक्कामादरम्यान अखंड वीजपुरवठा राहावा यासाठी विशेष दक्षता घेतली. संपूर्ण पालखी तळावर वीज व्यवस्थेची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली.

सायंकाळच्या प्रसन्न वातावरणात वरुणराजानेही विश्रांती घेतल्याने वारकऱ्यांचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला. टाळ-मृदंगाचा झंकार, अभंगांचा नाद, फुलांची उधळण आणि लाखो वारकऱ्यांचा एकसुरात होणारा हरिनामाचा गजर यामुळे कदमवाकवस्ती आणि लोणी काळभोर परिसर अक्षरशः भक्तीच्या महासागरात न्हाऊन निघाला. ग्रामीण भागातील पहिल्या मुक्कामाने वारकरी संप्रदायाच्या अखंड परंपरेचे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे पुन्हा एकदा भव्य दर्शन घडविले.

### विठ्ठला

**(दै. आरंभ पर्व)**

विटेवरून खाली येऊन,
हात कंबरेवरचा काढ देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला,
एकदा मातीमध्ये गाड देवा

भाकरीच्या कष्टामागे,
भुकेचे रोज वादळ उभे
लुटारूंच्या राजवाड्यांना,
सोन्याचे दरवाजे नवे

कष्टकऱ्यांच्या रित्या हाती,
जगण्याचा दे आधार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला,
एकदा मातीमध्ये गाड देवा

खुर्चीसाठी लाचार सारे,
रोजच इथे लिलाव होतो
सत्याला लाथ मारून,
खोट्याचाच विजय होतो

जनतेच्या या आक्रोशाला,
न्यायाचा दे आधार देवा
भ्रष्ट इथल्या
व्यवस्थेला, एकदा
मातीमध्ये गाड देवा

कायद्याच्या
पायरीवरती, पैशाचाच
दरबार भरतो
निर्दोषांच्या हुंदक्यांवरती,
गुन्हेगार मोकाट फिरतो

न्यायदेवतेच्या
डोळ्यांमध्ये, अंजन सत्याचे घाल देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला,
एकदा मातीमध्ये गाड देवा

नोकरीच्या प्रत्येक दारी,
वशिल्याचाच बाजार भरला
गुण, कष्ट, प्रामाणिकपणा,
आज फासावर चढला

तरुणाईच्या या स्वप्नांना,
धैर्याचा दे हुंकार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला,
एकदा मातीमध्ये गाड देवा

धर्मामधले व्यापारी सारे,
देवालाही घेती वाटून
जातीपातीच्या भिंती बांधून,
माणुसकीला टाकती छाटून

भक्तीच्या या मंदीराला,
प्रेमाचा दे गाभारा देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा
मातीमध्ये गाड देवा

कसा उभा रे विटेवरती?
किती मुक्याने पाहशील?
द्रौपदीचे वस्त्रहरण
आता, कितीदा
सहन करशील?

सुदर्शन नसेल हाती तरी,
न्यायाचा वज्र उगार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला,
एकदा मातीमध्ये गाड देवा

**- आकाश भोरडे (पुणे)**
**मो.नं. ९१५६७१५२७५**






### माउलींच्या पालखीचा सासवडला विसावा

पुणे शहरात दोन दिवस मुक्काम करून संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा शनिवारी दिवे घाटातील ७ किलोमीटरचा अवघड टप्पा पार करून संत सोपानकाकांच्या सासवड नगरीत विसावला. पंढरीला जाण्याच्या ओढीने विठू नामाचा गजर करीत नागमोडी वळणे आणि कठीण चढ असलेला दिवे घाट पालखी सोहळ्याने सायंकाळी सात वाजता पार केला. घाटामध्ये मोठा चढ असल्याने पालखी रथाला जादा बैलजोड्या लावण्यात आल्या. पुरंदर तालुक्यात प्रवेश केल्यानंतर माजी आमदार संजय जगताप, शिवसेना नेत्या ममता शिवतारे, जिल्हा परिषद सदस्य रूपाली झेंडे, हरिभाऊ लोळे, पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मुख्याधिकारी कैलास चव्हाण, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम रजपूत, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौड, पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. दिवे घाटात सध्या रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. ते अद्याप पूर्ण झालेले नाही. मात्र, रस्ता रुंद झाल्याने वारकऱ्यांना चालणे सोपे झाले. गेले काही दिवस मुसळधार पाऊस झाल्याने नागमोडी वळणांचा घाट हिरवागार झाला आहे. सायंकाळी पाच वाजता घाट चढायला सुरुवात होऊन सात वाजता पालखी सोहळा घाट चढून वर आला. सासवड येथे पालखी मार्गावर आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने सारा परिसर उजळला. रात्री पालखी तळावर आरती करण्यात आली. आता दोन दिवस मुक्काम करून सोमवारी (दि.१३) सकाळी खंडेरायाच्या जेजुरी नगरीत जाण्यासाठी पालखी सोहळा प्रस्थान ठेवणार आहे. अनेक कार्यालयांना शनिवारी सुटी असल्याने पुण्यातील अनेक युवक-युवती मोठ्या संख्येने वारीमध्ये सहभागी झाले होते. त्यांनी उत्साहाने पालखी रथांबरोबर दिवे घाट चढला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि पुणे महानगर परिवहन महामंडळाने या भाविकांना पुण्याकडे परतण्यासाठी जादा गाड्यांची व्यवस्था केली होती.

# वारीची अखंड परंपरा : भक्ती, समता आणि संस्कृतीचा अविरत प्रवाह



**"ज्ञानोबा माउली तुकाराम" या अखंड नामघोषाने दरवर्षी महाराष्ट्रातील लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. शेकडो वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही वारी केवळ धार्मिक यात्रा नाही, तर महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. संतांच्या विचारांनी प्रेरित झालेली ही परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने जोपासली जात आहे.**

वारीची सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीहून आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी देहूहून निघाल्याने होते. या दोन प्रमुख पालख्यांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक संतांच्या पालख्या, दिंड्या आणि लाखो वारकरी पायी चालत पंढरपूर गाठतात. या प्रवासात वय, जात, धर्म, भाषा, आर्थिक स्तर किंवा सामाजिक भेद यांना कोणतेही स्थान नसते. सर्वजण "माउली" या एका नात्याने जोडले जातात.

वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समतेचा संदेश. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत जनाबाई यांसारख्या संतांनी समाजाला समानतेचा, प्रेमाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. त्यांचे अभंग आजही वारकऱ्यांच्या मुखी असतात आणि समाजाला सदाचार, संयम व परस्पर स्नेहाची शिकवण देतात.

वारी ही शिस्त, सेवाभाव आणि संघटनशक्तीचे अद्वितीय उदाहरण आहे. हजारो दिंड्या ठराविक नियोजनानुसार चालतात. मुक्काम, भोजन, आरोग्य सेवा, स्वच्छता आणि सुरक्षेची व्यवस्था समाजातील विविध संस्था, स्वयंसेवक आणि प्रशासनाच्या सहकार्याने केली जाते. वारकऱ्यांची शिस्त, परस्पर सहकार्य आणि सेवाभाव पाहून प्रत्येकजण भारावून जातो.

टाळ, मृदंग, वीणा, अभंग, हरिपाठ आणि "ज्ञानोबा-तुकाराम"चा अखंड जयघोष यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय बनते. दिंड्यांमधील भजन, कीर्तन, भारुडे आणि फुगड्या ही वारीची सांस्कृतिक ओळख आहे. त्यामुळे वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून लोककला, लोकसंगीत आणि लोकसंस्कृतीचे जिवंत विद्यापीठ ठरते.

आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनातही वारीचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट तरुण पिढी मोठ्या संख्येने या परंपरेत सहभागी होत आहे. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, जलसंवर्धन, व्यसनमुक्ती आणि सामाजिक ऐक्य यांसारखे संदेशही वारीच्या माध्यमातून दिले जात आहेत. त्यामुळे वारी ही बदलत्या काळाशी सुसंगत राहून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनली आहे.

पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विठुरायाचे दर्शन घेऊन वारकरी पुन्हा आपल्या गावाकडे परततात; मात्र त्यांच्यासोबत भक्ती, समाधान आणि सकारात्मक जीवनदृष्टी घेऊन जातात. वारी संपते, पण विठ्ठलनामाचा प्रवास कधीच संपत नाही.

वारी ही महाराष्ट्राच्या अस्मितेची, संतपरंपरेची आणि मानवतेच्या मूल्यांची अखंड वाहणारी गंगा आहे. शतकानुशतके चालत आलेली ही परंपरा समाजाला एकत्र आणते, समतेचा संदेश देते आणि श्रद्धा, सेवा, शिस्त व संस्कृतीचा दीप सदैव तेवत ठेवते. म्हणूनच वारी ही केवळ पंढरपूरकडे जाणारी वाट नसून, माणसाला माणुसकीकडे नेणारी अखंड जीवनयात्रा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे





### अण्णासाहेब खोत व अनिता व्यवहारे यांचा पुरस्काराने सन्मान

सोलापूर (आरंभ पर्व) : सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य आणि उत्साहपूर्ण पुरस्कार वितरण सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले. या सोहळ्यात आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार अण्णासाहेब खोत यांना प्रदान करण्यात आला, तर आदर्श शिक्षक पुरस्कार अनिता व्यवहारे यांना देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार पुणे विभागाचे शिक्षक आमदार मा. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते सिंहगड कॉलेज सोलापूर येथे प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. बार्शी तालुक्यातील शेळगाव हायस्कूल येथे अण्णासाहेब खोत यांनी मुख्याध्यापक म्हणून शाळेच्या प्रगतीसाठी घेतलेले उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व मूल्यांची जपणूक यामुळे त्यांना हा पुरस्कार मिळाला. तसेच स्वामी विवेकानंद विद्यालय रुई येथील शिक्षिका अनिता व्यवहारे यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करून त्यांना प्रेरित करण्याचे कार्य केले असून त्यांच्या अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडून आले आहेत. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार विजेत्यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या योगदानाचे विशेष उल्लेख केले. यावेळी सहकारी धनाजी तिकटे(मुख्याध्यापक), बजरंग गायकवाड (सर) बळीराम गुरव(सर), सुनील खटाळ(सर), धनाजी शिंदे(सर), प्रकाश ठोकळ(सर) तसेच इतर सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पतसंस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांना शेळगाव आर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष बाबा गायकवाड, सचिव लक्ष्मणराव गायकवाड व संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या.

### "राम नाम जपना, पराया माल अपना" हेच भाजप चे धोरण : काँग्रेस'ची टीका




पिंपरी (आरंभ पर्व) : अयोध्या मधील श्रीराम मंदिरातील संघटित दरोडा प्रकरणी काँग्रेसचे महाराष्ट्रात विविध ठिकाणी रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आंदोलन सुरू आहे या अंतर्गत पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसकडून, चिंचवड येथील राम व हनुमान संयुक्त मंदिराजवळ जाऊन प्रार्थने द्वारे, सत्य समोर आणून कारवाईची मागणी करणारे 'रघुपति राघव राजाराम सत्याग्रह आंदोलन' करण्यात आले. या ठिकाणी असलेल्या सर्व देवतांचे पूजन करून सुरू झालेल्या या आंदोलनामध्ये सुरुवातीला रघुपती राघव राजाराम या सामूहिक भजन गाना ने सुरुवात करण्यात आली, त्यानंतर खरा तो एकची धर्म हे प्रार्थना गीत सामुहिक स्वरूपात गाण्यात आले. याप्रसंगी बोलताना प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते गोपाळदादा तिवारी म्हणाले, "अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिर ट्रस्ट मध्ये ४० दिवसांच्या सीसीटीव्हीतून ७० वेळा झालेल्या देणगी, निधी, पैशांची चोरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालया कडून चौकशीची मागणी करणे, आंदोलन करणे ही राम मंदीर, अयोध्या वा हिंदूंची बदनामी नसुन रामा प्रती श्रद्धा व आस्था असलेल्यांच्या भावनेप्रती कर्तव्यपुर्ती आहे.

### डॉ. जनार्दन भोसले यांना "स्वाभिमान लेखणी पुरस्कार" जाहीर



वाई (आरंभ पर्व) : चित्रपट नाट्यअभिनेते, दिग्दर्शक व पत्रकार महेश्वर भिकाजी टेतांबे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या "आर्यारवी एंटरटेनमेंट"या संस्थेच्या वतीने पहिल्या राज्यस्तरीय 'पत्रकार, मुक्तपत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाज सेवक पुरस्कार सोहळा २०२६ ची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या सोहळ्यात विविध पुरस्कारांपैकी प्रतिष्ठेचा "स्वाभिमान लेखणी पुरस्कार बावधन ता वाई येथील दैनिक तरुण भारत चे माजी पत्रकार ,पुणे येथील मुक्त पत्रकार डॉ. जनार्दन भोसले यांना जाहीर झाला आहे. दैनिक तरुण भारत बावधन चा वार्ताहर असताना तरुण भारत मध्ये वितरण, जाहिरात, वृत्त विभाग या विभागात उत्तम काम केल्या मुळे संपादक आदरणीय किरण ठाकूर सर यांनी विशेष सत्कार केला होता. समाजकारण आणि राजकारण यांची मूठ बांधून सर्वसामान्य माणसांना वर्तमान पत्रात बातमी रूपाने स्थान दिले. राजकिय बातम्या अधोरेखित केल्या गेल्या. तसेच साप्ताहिक कृष्णातीर, पोवई नाका, सहयाद्री चा एल्गार मध्येही उत्तम काम केले. पुण्यात २००५ पासून मुक्त पत्रकार काम करत आहे. या सर्व सेवेची दखल म्हणजे हा पुरस्कार आहे.

# पाणी कपातीचा निर्णय लांबणीवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पालखी सोहळ्यात नागरिकांसह वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी महापालिकेने दिवसाआड पाणीकपात रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच आज (रविवार) ही पाणीकपात रद्द करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र नुकत्याच झालेल्या जोरदार पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे पाणीकपात करण्याचा निर्णय लांबणीवर गेला आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत सध्या १६.६४ टीएमसी पाणी शिल्लक आहे. मागील वर्षी हा पाणीसाठा २०.४२ टीएमसी इतका होता. जोरदार पावसामुळे धरणातील पाणीसाठा १३ टीएमसीने वाढला आहे. त्यामुळे पाणीकपात पुन्हा सुरु करायची की नाही, याबाबत महापालिका प्रशासनाने कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. धरणात पुरेसा पाणासाठा असल्याने कोणतीही पाणीकपात करु नये, अशी मागणी महापालिकेतील काही पदाधिकाऱ्यांकडून केली आहे. पाणीकपात करायची झाल्यास पुन्हा दिवसाआड पाणी द्यायचे की दररोज दिल्या जाणाऱ्या पाण्याची वेळ कमी करायची याबाबत अद्यापही कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याने महापालिका प्रशासनाने १५ जूनपासून पुणेकरांना दिवसाआड पाणी देण्यास सुरुवात केली होती. यासाठी महापालिकेने पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक तयार करुन सम आणि विषम तारखांना पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या भागांची माहिती जाहीर केली होती. दरम्यान, महापालिकेने पाणीकपात सुरु केल्यानंतर जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच जोरदार पाऊस पडला. यामुळे धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली. पालखी काळात गैरसोय टळण्साठी महापालिकेने पाणीकपात रद्द करण्याचा निर्णय घेतला.

याबाबत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांना विचारले. ते म्हणाले, महापालिकेने पालखी पुण्यात असल्याने पाणीकपात रद्द करुन नियमीत पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. मात्र

त्यामध्ये अद्याप कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पाणीकपात करण्याचा निर्णय महापालिका घेणार नाही, तोपर्यंत सध्या ज्या पद्धतीने नियमीत पाणीपुरवठा केला जात आहे, तशाच पद्धतीने महापालिकेच्या वतीने केला जाणार आहे.

सोमवारपासून कोणत्याही भागात जुन्या वेळापत्रकानुसार पाणीकपात सुरु करु नये, अशा सूचना संबधित कनिष्ठ अभियंता यांच्यासह पाणीपुरवठा विभागाच्या संबधित अधिकारी, कर्मचारी यांना देण्यात आल्या आहेत. पुढील आठवड्यात महापालिकेतील सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक होईल, त्यामध्ये यावर निर्णय होईल.

### पुढील आठवड्यात निर्णय

धरणातील पाणीसाठा १६.६४ टीएमसीवर पोहचला आहे. पाणीकपात करायचा निर्णय घेण्यासाठी पुढील आठवड्यात सर्वपक्षाच्या नेत्यांची बैठक घेतली जाईल. त्यामध्ये चर्चा करुन निर्णय होईल. पुढील निर्णय होईपर्यंत नियमीत पाणीपुरवठा करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

**- मंजूषा नागपुरे, महापौर**

## ॲम्पियरआवर एनर्जीचा भारतातील स्मार्ट ऊर्जा साठवण उत्पादनात विस्तार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (BESS) क्षेत्रातील आघाडीची फुल-स्टॅक सोल्यूशन्स कंपनी ॲम्पियरआवर एनर्जीने आज पुण्यातील चाकण येथे आपल्या नव्या BESS उत्पादन व इंटिग्रेशन केंद्राचे उद्‍घाटन केले. या अत्याधुनिक केंद्रामध्ये 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार होणाऱ्या कॅबिनेट व कंटेनराइज्ड बॅटरी DC-AC ब्लॉक्सचे इंटिग्रेशन करून ते युटिलिटी-स्केल तसेच कमर्शियल आणि इंडस्ट्रियल (C&I) क्षेत्रांसाठी विकसित केले जाणार आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांसाठी फळे व पिण्याच्या पाण्याचे वाटप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आषाढी एकादशी व पालखी सोहळ्यानिमित्त पुणे शहरात आलेल्या वारकरी भाविकांच्या सेवेसाठी वकील मित्र परिवाराच्या वतीने फळे व थंड पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. "वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा" या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला वारकरी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी शेकडो वारकऱ्यांना केळी, फळे आणि थंड पिण्याचे पाणी वितरित करण्यात आले. या सेवेमुळे पायी वारी करणाऱ्या भाविकांना मोठा



दिलासा मिळाला. समाजसेवा, सहकार्य आणि मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. याप्रसंगी. ॲड शितल रनमले-कोल्हे म्हणाल्या, "समाजसेवेचा वारसा घरातूनच मिळाल्यामुळे समाजसेवा करणे हे माझे कर्तव्य बनले आहे. आम्ही वकील मित्र परिवार दरवर्षी पूर्ण श्रद्धा, निष्ठा आणि सेवाभावाने हा उपक्रम राबवत आलो आहोत. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंना मदत करण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील." या उपक्रमात . ॲड राजेश काटोरे यांच्यासह वकील मित्र परिवारातील अनेक सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. "ज्ञानोबा माऊली तुकाराम"च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात हा सेवा उपक्रम संपन्न झाला.

## जिल्हास्तरीय तायक्वांदो फाईट स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ

- आमदार शेखर निकम यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‍घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संगमेश्वर तालुका तायक्वांदो अकॅडमी व देवरुख तायक्वांदो क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने, रत्नागिरी तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित जिल्हास्तरीय तायक्वांदो फाईट स्पर्धा २०२६ चे उद्‍घाटन देवरुख येथे मोठ्या उत्साहात पार पडले.



या उद्‍घाटन समारंभास आमदार शेखर निकम, रवींद्रजी माने (माजी पालकमंत्री व राज्यमंत्री), माजी रत्नागिरी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहनजी बने, देवरुख नगराध्यक्ष मृणाल शेट्ये, देवरुख पंचायत समिती सभापती शर्वरी वेल्हे, उपसभापती प्रफुल्ल बाईत, स्मिता लाड, डेपो मॅनेजर मधाळे मॅडम, रूपाली कदम, यशवंत गोपाळ, प्रफुल्ल भुवड, दत्ता भस्मे, रामूशेठ पंदेरे, आदिती लोध, व्यंकटेश करारा, राजू वनकुद्रे, शशांक घडशी, अभिजीत शेट्ये, मोहन हजारे, बाळू शेठ ढवळे, बाळा पंदेरे, पंकज पुसाळकर, बंधू सुर्वे, आंबेकर मॅडम, पूर्वा पवार, उत्तम पवार, संदीप जागुष्टे, समीर राजवाडे, अकॅडमी व क्लबचे पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच, पालक, खेळाडू, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सर्व उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून खेळाडूंना शुभेच्छा देत, क्रीडासंस्कृतीचा विकास, शिस्त, मेहनत आणि सातत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले.

उद्‍घाटनप्रसंगी आमदार शेखर निकम यांनी सांगितले की, "खेळ हा केवळ पदक जिंकण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडविणारा संस्कार आहे.

## सौदीकडून 'पॅकेज व्हिसा'ची घोषणा

### प्रवास बुकिंगसह व्हिसा अर्ज प्रक्रिया होणार सुलभ

**रियाध (दै. आरंभ पर्व)**

जगभरातील पर्यटकांसाठी प्रवास अधिक सोपा आणि अखंड करण्याच्या उद्देशाने सौदी अरेबियाने 'पॅकेज व्हिसा' हा नवा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत पर्यटक व्हिसासाठीची अर्ज प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडण्यात आली असून, विमानप्रवास, निवास व्यवस्था आणि व्हिसा अर्ज ही संपूर्ण प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर पूर्ण करता येणार आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी सुरुवातीला निवडक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये पात्र प्रवास आणि पर्यटन सेवा प्रदात्यांमार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येत असून, पुढील काळात त्याचा व्यापक विस्तार करण्यात येणार आहे.




# मतदान हा अधिकार, भीती नव्हे तर विश्वास निर्माण करणारा व्हायला हवा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

**• मी मतदार बोलतोय •**

**शब्दांकन : नितीन घोलप**

**नऱ्हे, पुणे 96373 78572**

मतदान हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा संविधानाने दिलेला मूलभूत लोकशाही अधिकार आहे. या अधिकाराबाबत नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण होणे आवश्यक आहे. मात्र, अलीकडच्या काळात पुण्यासह अनेक ठिकाणी मतदानाची टक्केवारी घटत असल्याचे दिसून येते. याचे कारण केवळ नागरिकांची उदासीनता नसून, लोकशाही प्रक्रियेबाबत निर्माण झालेला अविश्वासही आहे.

सध्या SIR (Special Intensive Revision – विशेष सखोल पडताळणी) या मोहिमेबाबत नागरिकांना "वेळेत प्रक्रिया पूर्ण केली नाही तर तहसील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतील" अशा प्रकारचे संदेश दिले जात आहेत. जनजागृती करणे आवश्यक असले तरी ती भीतीच्या वातावरणात नव्हे, तर विश्वास आणि सहकार्याच्या भावनेतून व्हावी. कोणत्याही शासकीय मोहिमेत नागरिकांनी स्वेच्छेने सहभागी व्हावे, दडपणाखाली नव्हे.

सामान्य माणूस आधीच विविध शासकीय प्रक्रियांमध्ये अडकलेला आहे. कधी आधार कार्ड, कधी पॅन कार्ड, कधी मतदान ओळखपत्र, कधी रेशन कार्ड, कधी बँक खाते, कधी गॅस कनेक्शन, तर कधी इतर पडताळण्या. प्रत्येक वेळी झेरॉक्स, कागदपत्रे आणि सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारण्यात नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च होतात.



अशा परिस्थितीत अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, या सर्व प्रक्रियांचा आणि मतदानाचा त्यांच्या दैनंदिन जीवनावर नेमका किती सकारात्मक परिणाम होतो? रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य, शिक्षण, वाहतूक अशा मूलभूत समस्या कायम राहतात. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास कमी होण्याची भीती निर्माण होते.

लोकशाही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून ती लोकांचा सहभाग, पारदर्शक प्रशासन आणि उत्तरदायित्व यावर टिकून असते. नागरिकांना विश्वासात न घेता केवळ आदेश आणि प्रक्रिया वाढवल्यास लोकांचा सहभाग कमी होऊ शकतो. प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या मूळ शैक्षणिक कामाबरोबर जनगणना, मतदार यादी आणि इतर प्रशासकीय कामांमध्ये गुंतावे लागते. याचाही शिक्षण व्यवस्थेवर परिणाम होतो. सरकारी शाळा, सरकारी रुग्णालये आणि इतर सार्वजनिक सेवा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे.

आज नागरिकांना आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी, कुटुंबाच्या आरोग्यासाठी आणि रोजच्या गरजांसाठी पुरेसा वेळ मिळणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने शासकीय प्रक्रिया अधिक सुलभ, डिजिटल आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर द्यावा. लोकशाही मजबूत करण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोघांचीही प्रभावी भूमिका आवश्यक असते. निरोगी लोकशाहीत विचारांची देवाणघेवाण, टीका आणि संवाद यांना स्थान असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सार्वजनिक निधीचा पारदर्शक वापर, दर्जेदार विकासकामे आणि भ्रष्टाचारावर प्रभावी नियंत्रण यालाही प्राधान्य दिले पाहिजे.

देशाची प्रगती केवळ मोठ्या घोषणा किंवा प्रचारातून होत नाही. ती नागरिकांचा विश्वास, चांगले प्रशासन, दर्जेदार शिक्षण, सक्षम आरोग्य व्यवस्था आणि पारदर्शक लोकशाही यांवर अवलंबून असते. नागरिकांना भीती नव्हे, सन्मानाची आणि सहभागाची असते.






## पुण्यात मोफत "जयपूर फूट महाशिबिर" आयोजित

पुणे (आरंभ पर्व) : दिवंगत श्री अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ "मोफत जयपूर फूट अभियान – नवी चाल, नवा आत्मविश्वास" या उपक्रमांतर्गत दिव्यांग बांधवांसाठी मोफत कृत्रिम हात-पाय (जयपूर फूट) वितरण महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे महाशिबिर दि. २२ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत गुरुनानक दरबार गुरुद्वारा परिसर, कॅम्प, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या महाशिबिराचे आयोजन लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीम, रामेश्वर मणियार आर्किटेक्ट्स, द अंबादास खोबरागडे आर्ट फाउंडेशन, इंडियन रेड क्रॉस सोसायटी (पुणे व अकोला) तसेच गुरुनानक मेडिकल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. या महाशिबिराला महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राजी पवार यांनी उपस्थित राहण्यास सहमती दर्शविली आहे. अभियानाचे अध्यक्ष आर्किटेक्ट रामेश्वर मणियार, सह-अध्यक्ष दिलीपसिंह गोसल तसेच लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीमच्या अध्यक्षा आर्टिस्ट रजनी अंबादे यांनी त्यांची भेट घेऊन या सामाजिक उपक्रमाची माहिती दिली. महाशिबिरात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू दिव्यांग बांधवांना पूर्णपणे मोफत कृत्रिम पाय (जयपूर फूट), कृत्रिम हात तसेच विविध आवश्यक सहाय्यक उपकरणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. दिव्यांगांना स्वावलंबी बनविणे, त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आत्मविश्वासाला नवी दिशा देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

## नामदेव महाराज हरड यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन



पुणे (आरंभ पर्व) : पंढरपूर पायी वारीत जगद्गुरू संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने एकादशीला (दि.११) पहाटेच्या अमृतवेळी विश्वगुरु सन्मानित ह.भ.प. नामदेव महाराज हरड श्रीकाशी विद्वत परिषद प्रभारी वाराणसी यांना पादय महापुजेचा मान मिळाला. यावेळी हभप.मयुरानंदजी महाराज, ह.भ.प.समृद्धीताई भांडे तसेच संत तुकाराम महाराज संस्थान अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम् महाराज मोरे, संत तुकाराम महाराज वंशज व विश्वस्त ह.भ.प. माणिक महाराज मोरे तसेच हजारो वारकऱ्यांच्या उपस्थित पादुका पूजन व महाआरतीचा सोहळा पार पडला. विश्वगुरु सन्मानित नामदेव महाराज हरड हे काशी विद्वत परिषदचे प्रभारी आहेत. आगामी २०२७ सिंहस्थ कुंभमेळा अमृतस्नान महापर्वणी निमित्त त्र्यंबकेश्वर नाशिक येथे विश्वातील सर्वात मोठे संत व्यासपीठ प्रणेते निर्माते आहेत. या वेळी कुंभमेळयात येणाऱ्या तपस्वी साधु-संत आध्यात्मिक गुरूजनांचे १०८ संतांचे महापुजन करण्यात येणार आहे.

## प्रभावी वजन व्यवस्थापनासाठी सोहा अली खान यांच्या स्मार्ट खाद्य निवडी




पुणे (आरंभ पर्व) : डाएट कल्चर आणि आरोग्यविषयक परस्परविरोधी सल्ल्यांच्या लाटेमध्ये, वजन व्यवस्थापन हे पुन्हा पुन्हा नव्याने सुरुवात करण्याच्या अंतहीन चक्रासारखे वाटू शकते. जरी मर्यादित आहार पद्धती आणि तीव्र व्यायामामुळे जलद परिणाम मिळू शकतात, तरी दीर्घकाळ त्यामध्ये सातत्य राखणे कठीण होऊ शकते. वास्तविक, प्रभावी वजन व्यवस्थापन हे क्वचितच वंचित राहण्याबद्दल असते. त्याऐवजी, आजच्या व्यस्त आणि मागणीपूर्ण जीवनशैलीमध्ये सहजपणे समाविष्ट करता येतील अशा शाश्वत सवयी निर्माण करणे आणि स्मार्ट निवडी करणे याबद्दल ते आहे. कॅलिफोर्निया बदाम ही अशीच एक निवड आहे. नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध असलेले हे बदाम 24 पोषक घटक प्रदान करतात आणि यामध्ये तृप्ती देणारे गुणधर्म असतात, जे तुम्हाला अधिक वेळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करू शकतात आणि तुमच्या वजन व्यवस्थापनाच्या प्रवासाला आधार देऊ शकतात.

# "लढणारे मावळे सोबत असल्यास मला कोणतीही भीती नाही" : उद्धव ठाकरे

• खडकवासला विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत शिवसैनिकांना दिला एकजुटीचा संदेश •



पुणे (दै. आरंभ पर्व)

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते यांच्या नेतृत्वाखाली मातोश्री या निवासस्थानी

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या पदाधिकारी व प्रमुख शिवसैनिकांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. आगामी संघटनात्मक बांधणी, जनसंपर्क, पक्षविस्तार आणि राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान उद्धव ठाकरे यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांशी संवाद साधत, "लढणारे मावळे सोबत असल्यास मला कोणतीही भीती नाही," असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या या विधानाला उपस्थित शिवसैनिकांनी जोरदार प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. यावेळी सहसंपर्क प्रमुख गजानन थरकुडे, जिल्हाप्रमुख प्रकाश भेगडे, खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते,महेश मते, बुवा खाटपे, तानाजी पवळे, उमेश सुर्वे, मदन मते, भारत आबा कुंभारकर, अमोल दांगट, राजाभाऊ चव्हाण, निवृत्ती व्हावल, आकाश यादव, राहुल घुले, जितेंद्र सपकाळ, किशोर डेंगळे, विजय दारवटकर यांच्यासह मोठ्या संख्येने निष्ठावंत शिवसैनिक उपस्थित होते. बैठकीत पक्ष संघटना अधिक बळकट करणे, तळागाळातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे, नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करणे आणि आगामी काळात शिवसेनेची भूमिका अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीनंतर उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकवासला विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणखी वाढविण्यासाठी कार्यकर्ते जोमाने कामाला लागतील, असा विश्वास यावेळी विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते यांनी व्यक्त केला.

'सूर्यदत्त'च्या कॉलेज ऑफ फिजिओथेरपी व कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे

## वारकऱ्यांसाठी 'आरोग्य भारती - चरण सेवा' उपक्रमाचे आयोजन



• पालखी सोहळ्यात पाहायला मिळाला फिजिओथेरपी, आरोग्य मार्गदर्शन व समाजसेवेचा अनोखा संगम

पुणे (दै. आरंभ पर्व)

आषाढी वारीनिमित्त वारकरी भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी, हेल्थकेअर अँड रिसर्च आणि मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्य भारती - चरण सेवा' या विशेष आरोग्य सेवा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. पुण्यातील नाना पेठ येथे आयोजित या समाजोपयोगी उपक्रमात २५० हून अधिक वारकऱ्यांनी सेवा, आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या प्रेरणादायी नेतृत्वातून आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना समाजसेवेची अनोखी मानवंदना म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. 'संस्कार, संस्कृती आणि शिक्षण' या त्रिवेणीवर आधारित हा सेवा उपक्रम प्राचार्या डॉ. सिमी रेठरेकर व प्राचार्या डॉ. सारिका झांबड यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला. आषाढी वारीदरम्यान शेकडो किलोमीटर पायी प्रवास करणाऱ्या वारकरी भाविकांना होणारा स्नायू व सांध्यांचा ताण, पायातील वेदना, थकवा आणि इतर शारीरिक त्रास लक्षात घेऊन कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी प्रा. डॉ. चैताली नेवे (पीटी), डॉ. आयझॅक साळवे (पीटी) आणि डॉ. अक्षता माने (पीटी) यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांची सखोल तपासणी करून आवश्यक फिजिओथेरपी उपचार दिले.

## व्हिस्काासने भारतासाठी पहिल्यांदाच स्थानिक चवीवर आधारित नवे कॅट फूड सादर केले

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह कॅट फूड ब्रँड व्हिस्कास® ने आज नवीन इंडियन फिश रेंज सादर केली. ही नवी रेंज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय आणि मोठ्या प्रमाणावर खाल्ल्या जाणाऱ्या रोहू आणि कतला या माशांपासून प्रेरित आहे. भारतीय घरांमध्ये परिचित असलेल्या माशांच्या चवीला व्हिस्कास® च्या विश्वासार्ह पोषणतज्ज्ञतेची जोड देत, या उत्पादनात व्हिस्कास® चे खास कुरकुरीत क्रीमी यम्मी पॉकेट्स समाविष्ट करण्यात आले आहेत. हे कॅट फूड विशेषतः मांजरांसाठी तयार करण्यात आले असून, त्यातून 100 टक्के संपूर्ण आणि संतुलित पोषण मिळते. भारतीय पाळीव प्राणी पालकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले हे भारतातील




या प्रकारचे पहिले नाविन्यपूर्ण उत्पादन आहे. ओम्निकॉम ॲडव्हर्टायझिंग इंडियाचा भाग असलेल्या 22फीट या संस्थेने या मोहिमेची संकल्पना तयार केली आहे. या मोहिमेत बॉलिवूड अभिनेत्री आणि मांजरप्रेमी मृणाल ठाकूर सहभागी झाली आहे.

मांजरांसोबतचा तिचा वैयक्तिक अनुभव या मोहिमेला विश्वासार्हता आणि आपलेपणा देतो. त्यामुळे व्हिस्कास® च्या या पहिल्या इंडियन फिश रेंजची ओळख करून देण्यासाठी ती योग्य चेहरा ठरली आहे.

## प्रभात तरुण मित्र मंडळातर्फे संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालख्यांचे जल्लोषात स्वागत



पुणे (दै. आरंभ पर्व)

आषाढी वारीनिमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे डेक्कन जिमखाना येथील गुडलक चौकात प्रभात तरुण मित्र मंडळाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी पालखीसोबत आलेल्या वारकरी बंधू-भगिनींसाठी मंडळाच्या वतीने राजगिरा लाडू, चिक्की, बिस्किटे, बटाटा चिवडा आदी खाद्यपदार्थांसह पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट (प्लास्टिक इरले) यांचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाला वारकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात मंडळाचे कार्याध्यक्ष अपूर्व सोनटक्के, अध्यक्ष बाळासाहेब गिराम, उत्सव प्रमुख सिद्धार्थ भोंडे, पियुष भळगट, प्रिया रानडे, किमया ढेकणे, सुवर्णा ऋषी, वृंदा बाम, सुनीता जेऊर, प्रिती फडके, वृंदा गिराम, वैशाली जोगळेकर, योगेश जोगळेकर, समर ठकार, प्रणव बाम, मिलिंद टकले, पुष्कर लिमये, सुषमा कार्ले, पूर्वा गोडबोले आणि प्राजक्ता जोगळेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते सक्रियपणे सहभागी झाले होते.

या उपक्रमामुळे वारकऱ्यांच्या सेवेसोबतच अध्यात्मिक आणि सकारात्मक उर्जेचा अनुभव मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. प्रभात तरुण मित्र मंडळ सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत असून, ही संकल्पना आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि नगरसेवक सुनील पांडे यांच्या प्रेरणेतून साकारण्यात आली. या प्रसंगी भाजपच्या नगरसेविका निवेदिता एकबोटे, नगरसेवक अपूर्व खाडे तसेच सरचिटणीस अर्चना सोनावणे यांनी उपस्थित राहून उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

# सारोळे : ४८८ नागरिकांची आरोग्य तपासणी

## ग्रामपंचायत प्रशासन व आरोग्य विभागाचे नागरिकांनी मानले आभार





बार्शी (दै. आरंभ पर्व)

"माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र गौडगाव व ग्रामपंचायत कार्यालय सारोळे यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल ४८८ नागरिकांनी विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन प्रशासक तथा सरपंच सौ. सुवर्णा सुशांत काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे, विश्वनाथ साबळे सर, माजी सरपंच बाळराजे गाटे, प्रकाशभैया गाटे,आरपीआय नेते रविराज पाटील, अंगणवाडी सेविका प्रमिला मुंबरे, प्रतिभा साबळे, अंगणवाडी मदतनीस व आशा वर्कर् व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. रणजीत जाधवर पाटील, समुदाय आरोग्य अधिकारी विकास वैद्य, श्रीमती धुळगुंडे मॅडम, पूजा वाघमारे, श्रीमती अंधारे मॅडम, आरोग्य सहायिका लिके सिस्टर, आरोग्य सेवक एस. पी. पाटील, एल. यू. सावंत, आरोग्य सेविका श्रीमती शेख एन. एम., काकडे सिस्टर, खटाळ सिस्टर, लॅब टेक्निशियन शुभम खरटमोल, वाहन चालक रमेश काजळे, आप्पा ठोंबरे आणि कोमल लोखंडे यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

शिबिरात ७३ नागरिकांची उच्च रक्तदाब तपासणी, ९४ जणांची मधुमेह तपासणी, १३ जणांची कॅन्सर स्क्रीनिंग, १२ गर्भवती मातांची तपासणी, ३२ किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी, ३८ ईसीजी, ४५ रक्त तपासण्या करण्यात आल्या. तसेच १८१ नागरिकांना किरकोळ आजारांवरील औषधोपचार देण्यात आले. अशा प्रकारे एकूण ४८८ लाभार्थींनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वागत केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विजय महापुरे, लक्ष्मण ठोंबरे यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्वच एका छताखाली झालेल्या या आरोग्य शिबिरा मुळे नागरिकांना विशेष लाभ झाला. त्याबद्दल ग्रामपंचायत प्रशासन व आरोग्य विभाग यांचे नागरिकांनी आभार मानले.




## अत्याधुनिक तंत्रज्ञान समाधान सादर

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतातील उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्र स्मार्ट फॅक्टरी आणि शाश्वत उत्पादन प्रक्रियेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असताना, तैवान एक्सलन्स ऑटोमेशन एक्स्पो 2026 मध्ये तैवानमधील अत्याधुनिक औद्योगिक तंत्रज्ञान भारतीय उद्योगांसमोर सादर करणार आहे. यामुळे भारतीय उत्पादकांना बुद्धिमान (इंटेलिजंट) उत्पादन व्यवस्थेच्या भविष्यातील तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. 22 ते 25 जुलै दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित ऑटोमेशन एक्स्पो 2026 मधील तैवान एक्सलन्स पॅव्हेलियनमध्ये 22 पुरस्कारप्राप्त तैवानी ब्रँड्सची नवकल्पना प्रदर्शित केली जाणार आहे. या प्रदर्शनात AI एज कॉम्प्युटिंग, रोबोटिक्स आणि स्मार्ट ऑटोमेशन तसेच औद्योगिक उपकरणे आणि घटक (Industrial Equipment & Components) या क्षेत्रांतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश असेल.

## आषाढी वारीनिमित्त धायरीतील व्यंकटसाई होंडाकडून वारकऱ्यांची अपूर्व सेवा

### तिसऱ्या वर्षीही सेवाभावाची परंपरा कायम




पुणे (दै. आरंभ पर्व)

आषाढी वारी म्हणजे भक्ती, सेवा आणि समर्पणाचा उत्सव. "वारकरी सेवा हीच खरी ईश्वर सेवा" हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून जपत धायरी येथील व्यंकटसाई होंडा (सेल्स अँड सर्व्हिस), राजमाता जिजाऊ नवरात्र उत्सव मंडळ, व्यंकटसाई किचन आणि साई व्यंकट मोटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने वारकऱ्यांसाठी सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील शहापूर येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. दत्ता महाराज गीते सुभाषनगरकर यांच्या दिंडीतील वारकऱ्यांचे पुण्यात आगमन झाल्यानंतर त्यांचे आत्मीयतेने स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांच्या निवास, भोजन व्यवस्था करून त्यांना सकस नाश्ता व महाप्रसाद देण्यात आला. वारीच्या प्रदीर्घ प्रवासामुळे थकलेल्या वारकऱ्यांना या सेवेमुळे मोठा दिलासा मिळाला.

या सेवाभावी उपक्रमाचे हे सलग तिसरे वर्ष असून, दरवर्षी अधिकाधिक भक्तिभावाने वारकऱ्यांची सेवा करण्याची परंपरा व्यंकटसाई होंडाने जपली आहे. व्यंकटसाई होंडाचे संतोष कदम हे विविध सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असतात. समाजाप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि सेवाभाव या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

या उपक्रमात व्यंकटसाई होंडाचे संतोष कदम , रामचंद्र पोळेकर, केतन शिंदे, उमा रॉय, हेमेंद्र जोशी, डॉ. प्रमोद दिवेकर यांच्यासह अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कै. मा. माजी नगरसेवक हरिश्चंद्र (आण्णा) दांगट यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून समाजसेवा, भक्ती आणि मानवतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आयोजकांच्या निस्वार्थ सेवेमुळे हा उपक्रम आषाढी वारीतील प्रेरणादायी सेवाकार्य ठरला.



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा



## थोडक्यात पण महत्वाचे



### धाराशिव फाउंडेशन व तनिष्क सोसायटीचा स्तुत्य उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : आषाढी एकादशीच्या निमित्ताने संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याला आळंदी येथून उत्साहात प्रारंभ झाला. या पवित्र वारी सोहळ्यात सहभागी झालेल्या हजारो वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी आमदार कैलासदादा पाटील (धाराशिव-कळंब विधानसभा) यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव फाउंडेशन आणि तनिष्क सोसायटी, दिघी यांच्या वतीने सेवा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांना पोहे, खिचडी, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, बिस्किटे तसेच पावसाळ्याचा विचार करून रेनकोटचे वाटप करण्यात आले. विठ्ठल नामाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात वारकऱ्यांनी या सेवाभावी उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. वारकरी संप्रदायात सेवा हीच खरी ईश्वरभक्ती मानली जाते. त्याच भावनेतून विठ्ठल भक्तांची सेवा करण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. सामाजिक बांधिलकी जपत वारकऱ्यांच्या सोयीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित भाविकांनी कौतुक केले. विठ्ठल भक्तांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत धाराशिव फाउंडेशन व तनिष्क सोसायटी यांनी राबविलेला हा उपक्रम आषाढी वारीतील सेवाभावाचा आदर्श ठरला. या उपक्रमासाठी शरद सावंत, आशिष रघुवंशी, विकास पाटील, विजय माळी, कपिल खडके, पवन होळदुरकर, अंबादास कोताकालूरे, हरीश जोगू, महेश वानखेडे, रुक्मिणी धोलताडे, दीपाली रानडे, अॅड. संतोष मोरे, निलेश लांडगे,नितीन जमादार या सदस्यांनी परिश्रम घेतले.

### नगरसेवक सुभाष नाणेकर यांची आळंदी ते पुणे पायी वारीची परंपरा



पुणे (आरंभ पर्व) : विठ्ठलाच्या चरणी असलेली श्रद्धा, माऊलीच्या नामावरचा अढळ विश्वास आणि समाजाला भक्तीच्या एका धाग्यात गुंफण्याची भावना जपणारे नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी यंदाही सलग १८ व्या वर्षी आळंदी ते पुणे पायी वारी करत आपली विठ्ठल भक्ती जपली आहे. पहाटेच्या भक्तिमय वातावरणात "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात वारकऱ्यांची पावले पुण्याकडे पडू लागली. टाळ-मृदंगाचा नाद, विठू माऊलीच्या नामाचा गजर आणि डोळ्यांत भक्तिभाव... या साऱ्यांनी संपूर्ण वातावरण विठ्ठलमय झाले. या पायी वारीत पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक सुभाष नाणेकर, हे आपले सहकारी यांच्यासोबत वारीत सहभागी झाले. यावेळी अरुणअण्णा दांगट, सुभाष शिंदे,राहुल मोरे, सचिन कांबळे, दादा नवले उपस्थित होते. ही वारी केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चालत जाण्याचा प्रवास नाही; तर श्रद्धा, सेवा, समर्पण आणि माणुसकीचा वारसा जपणारी परंपरा आहे. सलग १८ वर्षे कोणताही खंड न पडता ही परंपरा जपणारे नगरसेवक सुभाष नाणेकर यांची भक्ती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. "पंढरीच्या वाटेवर चालणारे प्रत्येक पाऊल हे विठ्ठलाच्या चरणांकडे जाणारे असते; आणि त्या वाटेवर चालणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याची सेवा हीच खरी माऊलीची सेवा आहे," अशी भावना नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी व्यक्त केली आहे.

# अतिवृष्टीमुळे खडकवासला मतदारसंघात मोठे नुकसान

## आमदार भीमराव तापकीर यांनी विधिमंडळात उपस्थित केला गंभीर मुद्दा

**मुंबई/पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील अतिवृष्टीमुळे खडकवासला मतदारसंघात झालेल्या गंभीर नुकसानीचा मुद्दा आमदार भीमराव तापकीर यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या सभागृहात प्रभावीपणे उपस्थित करत बाधित नागरिकांना तातडीने दिलासा देण्याची मागणी केली.




रिंगरोडच्या कामादरम्यान चिखलात उतरलेल्या वीजप्रवाहाचा फटका
शेतकऱ्याचे दोन बैल दगावले, भरत सुर्वे यांचा जीव थोडक्यात बचावला

आमदार तापकीर यांनी सभागृहात सांगितले की, मतदारसंघात सुरू असलेल्या रिंगरोडच्या कामादरम्यान संबंधित ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे मालखेड व वरदाडे येथील पूल अतिवृष्टीत वाहून गेला. या घटनेमुळे तब्बल २५ गावांचा शहराशी असलेला संपर्क तुटला असून, हजारो नागरिकांना दैनंदिन व्यवहार, शिक्षण, आरोग्य सेवा आणि शेतीसंदर्भातील कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकारामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. याचबरोबर या निष्काळजीपणामुळे निर्माण झालेल्या वीजप्रवाहाच्या धोकादायक परिस्थितीत दोन निष्पाप बैलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक बाबही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. या घटनेमुळे संबंधित यंत्रणांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, दोषी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार तापकीर यांनी केली.

या गंभीर विषयाची तात्काळ दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सभागृहात सकारात्मक भूमिका मांडली. MSRDC च्या माध्यमातून मालखेड-वरदाडे येथील पुलाची युद्धपातळीवर दुरुस्ती करून वाहतूक शक्य तितक्या लवकर पूर्ववत करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार तातडीने नुकसानभरपाई देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे ठोस आश्वासनही त्यांनी दिले.

आमदार भीमराव तापकीर यांनी खडकवासला मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या विधिमंडळात ठामपणे मांडल्याने बाधित गावांतील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनांची तातडीने अंमलबजावणी करून वाहतूक पूर्ववत करावी, नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना त्वरित मदत द्यावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आता परिसरातून जोर धरू लागली आहे.

## अनेक वर्षापासून रस्त्यावरच वाहते पाणी; स्टॉर्म वॉटर ड्रेनेजची गरज

**पुणे-लक्ष्मण साबळे**
**(दै. आरंभ पर्व)**



सिंहगड रस्त्यालगतच्या प्रभाग क्रमांक ३४ मधील नऱ्हे परिसरात पर्जन्यजल निचरा वाहिनी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज नसल्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात मुख्य रस्ते तसेच अंतर्गत मार्गांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. यामुळे वाहनचालक, पादचारी, शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून नागरिकांनी प्रशासनाकडे कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे.

गेल्या काही वर्षांत नऱ्हे परिसरात झपाट्याने नागरीकरण झाले आहे. अनेक गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक संकुले आणि वाढती लोकसंख्या यामुळे वाहतुकीची वर्दळही वाढली आहे. मात्र, या वाढत्या विकासाच्या तुलनेत पर्जन्यजल निचऱ्याची आवश्यक सुविधा उभारण्यात आलेली नसल्याने मुसळधार पावसात पाणी थेट रस्त्यावर साचते आणि अनेक ठिकाणी जलसाठे निर्माण होतात. रस्त्यांवर साचलेल्या पाण्यामुळे खड्डे दिसत नसल्याने दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. तसेच वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि व्यावसायिकांचे आर्थिक नुकसानही होत आहे. काही ठिकाणी पाणी घरांच्या आवारात तसेच दुकानांमध्ये शिरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जात असली तरी स्वतंत्र पर्जन्यजल निचरा व्यवस्था नसल्यामुळे हा प्रश्न कायम राहतो. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता संपूर्ण नऱ्हे परिसरासाठी नियोजनबद्ध स्टॉर्म वॉटर ड्रेनेज प्रकल्प राबविण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

> पुणे महानगरपालिका तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन पर्जन्यजल निचरा वाहिनीचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा प्रत्येक पावसाळ्यात नऱ्हेकरांना याच समस्येला सामोरे जावे लागणार असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे.

## ८४ वर्षीय रुग्णावर जीवघेण्या महाधमनीच्या विकारावर यशस्वी शस्त्रक्रिया

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथील हृदयविकारतज्ज्ञ आणि कार्डिओव्हॅस्क्युलर अँड थोरॅसिक सर्जरी (CVTS) विभागाने 84 वर्षीय रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीच्या टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन या जीवघेण्या आजारावर यशस्वी बेंटॉल (Bentall) शस्त्रक्रिया करून त्याला नवजीवन दिले. रुग्णाला अशक्तपणा आणि पोटात अस्वस्थता जाणवत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सीटी अँजिओग्राफीसह विविध तपासण्यांमध्ये महाधमनीच्या चढत्या भागापासून (Ascending Aorta) ते मूत्रपिंडाखालील भागापर्यंत (Infrarenal Abdominal Aorta) पसरलेले टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन असल्याचे निदान झाले. हा आजार कोणत्याही क्षणी महाधमनी फुटण्याचा आणि अचानक मृत्यूचा धोका निर्माण करणारा असल्याने तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला. सीव्हीटीएस शल्यचिकित्सकांनी बायोप्रोस्थेटिक एओर्टिक व्हॉल्व्ह आणि व्हॅस्क्युलर कंड्युटचा वापर करून बेंटॉल शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या शस्त्रक्रियेदरम्यान खराब झालेला महाधमनीचा मूळ भाग आणि चढता भाग बदलण्यात आला तसेच हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या कोरोनरी धमन्यांचे पुनर्स्थापन करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटर, रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक औषधे, रक्त व रक्तघटकांचे संक्रमण आणि सतत निरीक्षणाखाली ठेवण्यात आले.

## ३०० वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप

### मायमेड पॅथ पथोलॉजी व सुर्यनाथा पैरामेडिकल नर्सिंग इन्स्टिट्यूटचा सेवाभावी उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आषाढी वारीनिमित्त पुण्यात दाखल झालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी संस्कार फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट, मायमेड पॅथ डायग्नॉस्टिक सेंटर आणि सुर्यनाथा पैरामेडिकल अँड नर्सिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमात सुमारे ३०० वारकऱ्यांनी आरोग्य तपासणी करून मोफत औषधांचा लाभ घेतला. या शिबिरामुळे वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली गेली असून त्यांच्या प्रवासातील थकवा कमी करण्यास मोठी मदत झाली.

नांदेड जिल्ह्यातील शहापूर येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. दत्ता महाराज गीते सुभाषनगरकर यांच्या दिंडीतील वारकऱ्यांसाठी सकस नाश्ता, महाप्रसाद, आरोग्य तपासणी आणि आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. वारीच्या प्रदीर्घ प्रवासामुळे थकलेल्या वारकऱ्यांचे पुण्यात आगमन होताच त्यांचे आत्मीयतेने स्वागत करण्यात आले. या सेवेमुळे वारकऱ्यांना केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक समाधानही लाभले.

या उपक्रमात संस्कार फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्षा तसेच सुर्यनाथा पैरामेडिकल अँड नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या फाउंडर डायरेक्टर उमा राय (रसाळ), व्यवस्थापकीय संचालक हेमेन्द्र जोशी, डॉ. संतोष कुमारी चौधरी, डॉ. दीपाली कांबळे, महेश बजाज, विघ्नहर्ता हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रमोद दिवेकर, प्रदीप मानकर, सौ. शीतल मिठे, सुर्यनाथा पैरामेडिकल अँड नर्सिंग इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी, मायमेड पॅथचे कर्मचारी तसेच केतन शिंदे, शंकरराव इंगवले, गंगाधरजी भडावाले, संतोष कदम, पोळेकर सर आणि अनेक स्वयंसेवकांनी सेवाकार्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांनी मिळून अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने हा उपक्रम यशस्वी केला.

शिबिरात वारकऱ्यांची रक्तदाब, साखर, तापमान यांसारख्या प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या तसेच आवश्यकतेनुसार औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करत संत परंपरेचा सेवाभाव जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. हा संपूर्ण सेवाभावी उपक्रम कै. मा. हरिश्चंद्र (आण्णा) दांगट यांच्या पावन स्मृतीस अभिवादन म्हणून आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सुर्यनाथा पैरामेडिकल अँड नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या संचालिका उमा राय (रसाळ) यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सेवाकार्यात सहभागी करून घेतले. "नर्सिंगचे शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांच्या मनात निःस्वार्थ समाजसेवेची भावना रुजावी आणि रुग्णसेवा हीच खरी मानवसेवा आहे, याची जाणीव व्हावी," या उद्देशाने विद्यार्थ्यांना या सेवाकार्यात सहभागी होण्याची संधी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत अनुभवातून शिकण्याची संधी मिळाल्याचे सांगितले.

## पूरग्रस्त एकता नगर, विठ्ठल नगरच्या कायमस्वरूपी पुनर्वसन करा

**पुणे -लक्ष्मण साबळे**
**(दै. आरंभ पर्व)**


● आ. भीमराव तापकीर

पुणे शहराच्या पश्चिम भागात सलग मुसळधार पाऊस झाल्यानंतर वरसगाव, पानशेत आणि टेमघर या धरणसाखळीतील जलसाठ्यात झपाट्याने वाढ होत असल्याने खडकवासला धरणातून नियंत्रित पद्धतीने पाण्याचा विसर्ग करावा लागतो. या विसर्गाचा थेट परिणाम धरणाच्या खालच्या प्रवाहातील एकता नगर, विठ्ठल नगर आणि लगतच्या सखल भागांवर होत असून, दरवर्षी पावसाळ्यात या परिसरात पूरस्थिती निर्माण होते. यामुळे शेकडो कुटुंबांचे जनजीवन विस्कळीत होत असून मालमत्तेचे नुकसान, रोजगारावर परिणाम, शैक्षणिक अडथळे आणि आरोग्यविषयक समस्यांनाही नागरिकांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी आज विधानसभेत हा गंभीर आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न उपस्थित केला. वारंवार पूरग्रस्त होणाऱ्या एकता नगर, विठ्ठल नगर तसेच इतर प्रभावित भागांतील नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी विशेष योजना राबविण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी शासनाकडे केली.

तसेच केवळ तात्पुरत्या मदतीवर भर न देता पूरनियंत्रणासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत उपाययोजना हाती घेण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. नदीपात्रातील अडथळे दूर करणे, पूररेषेतील अतिक्रमणांवर प्रभावी कारवाई, आधुनिक पूरपूर्व सूचना प्रणाली, धरणांच्या विसर्गाचे अधिक वैज्ञानिक नियोजन आणि स्थानिक प्रशासनामध्ये समन्वय वाढविणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता त्यांनी सभागृहात मांडली. यावर प्रश्नाची गंभीर दखल घेत संबंधित विभागांकडून पूरग्रस्त भागांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात येतील. प्रभावित नागरिकांना आवश्यक ती मदत देण्याबरोबरच कायमस्वरूपी पुनर्वसनाच्या प्रस्तावाचाही सकारात्मक विचार केला जाईल, असे शासनाच्या वतीने यावेळी सांगण्यात आले. दरवर्षी उद्भवणाऱ्या पूरस्थितीला कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा पूरग्रस्त नागरिकांकडून व्यक्त होत आहे आमदार भीमराव तापकीर यांनी विधानसभेत हा मुद्दा प्रभावीपणे मांडल्याने या प्रश्नाच्या सोडवणुकीबाबत नव्याने आशा निर्माण झाली आहे.

## जुन्नर-आंबेगाव प्रांत कार्यालयासमोर शिक्षकांचे 'शाळा बंद' आंदोलन

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**



बीएलओच्या अशैक्षणिक कामातून प्राथमिक शिक्षकांची पूर्ण मुक्तता करण्यात यावी, कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्णतेची अट शिथिल करण्यात यावी या प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समन्व्यक संघटनेच्या वतीने गुरुवारी दि.१० रोजी मंचर येथे जुन्नर-आंबेगाव प्रांत कार्यालयासमोर शिक्षकांनी शाळा बंद आंदोलन केले.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गावात इतर कोणताही शासकीय कर्मचारी उपलब्ध नसेल तरच शिक्षकांना बीएलओ म्हणून नियुक्त करावे असे नमूद करण्यात आले आहे. तरीही स्थानिक पातळीवर केवळ प्राथमिक शिक्षकांनाच या कामाला जुंपले जात आहे. हा शिक्षकांवर अन्यायच आहे. शिक्षकांची या कामातून मुक्तता करण्यात यावी, कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्णतेची अट शिथिल करण्यात यावी किंवा त्यांच्यासाठी ते शिकवत असलेल्या इयत्तांच्या अभ्यासक्रमावर आधारित टीईटी समकक्ष पात्रता परीक्षा आयोजित करण्यात यावी आदी मागण्यांसाठी समनव्य समितीने आंदोलन आयोजित केले होते.

या आंदोलनात पुणे जिल्हा शिक्षक समितीचे कार्याध्यक्ष बाळासाहेब लांघी, अखिल प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुभाष मोहरे, शिक्षक समिती पुणे जिल्ह्याचे माजी सरचिटणीस राजेश ढोबळे, शिवाजीराव पाटील गटाचे अध्यक्ष मोहन नाडेकर,समितीचे तालुका अध्यक्ष राजेश दूरगुडे, आंबेगावचे अध्यक्ष राजेंद्र शेळकंदे नारायण मराडे, नामदेव मुंडे रवी डुंबरे, शिक्षक भारतीचे नितीन शिंदे आदिवासी संघटनेचे मच्छिंद्र लोहकरे मोहन मुंडे, संपर्कप्रमुख अंकुश साबळे व वळवी यांची भाषणे झाली शेवटी प्रांत अधिकारी अर्चना तांबे व नायब तहसीलदार सचिन मुंढे यांना निवेदन देऊन आंदोलनाची सांगता झाली.

## अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपा-शिवसेना महायुतीचा दणदणीत विजय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीपाठोपाठ आता अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय चाणक्यनीतीचा करिष्मा दिसून आला आहे. वास्तविक ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत सहकार पॅनल विरुद्ध परिवर्तन पॅनल अशी लढत झाली असली, तरीही बहुजन विकास आघाडीचे बँकेवर वर्षानुवर्षे असणारे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांनी भाजपा आणि शिवसेना या दोन्हीही पक्षांचे उमेदवार दोन्ही पॅनलमध्ये उभे केले होते. या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे दोन्ही पॅनलमध्ये मिळून १४ उमेदवार निवडून आल्याने अध्यक्षपदावर कोणाचा उमेदवार निवडून येतो हे पाहणे रंजक ठरले होते.

## ज्येष्ठ वारकऱ्यांना पुरस्कार प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यात दाखल झालेल्या वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ सेवेकरी, भजन-कीर्तन, संगीत, सामाजिक आणि संतसेवा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वारकऱ्यांचा 'जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराज जीवनगौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मान करण्यात आला. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी म्हणून सौ. सुलभा विजयकुमार दिवाण (भजनी गायिका), ह.भ.प. पांडुरंग दत्तात्रय गुजाका (भजनी गायक), ह.भ.प. हर्षल एकनाथ जाधव (मृदुंगमनी, संगीत विशारद), श्रीमती कांता साहेबराव लांडगे (भजनी गायिका), गणेश केशव गायकवाड (दत्त सेवक), श्रीमती शांताबाई पाटलोजी ढोरे (भजनी गायिका) आणि ह.भ.प. बाबासाहेब दत्तात्रय रानवडे (भजनी मंडळ) यांचा सन्मान करण्यात आला. बोपोडी मेट्रो स्टेशनजवळील पालखी विसावा स्थळी पार पडलेल्या या कार्यक्रमाला महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर तथा समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, नगरसेवक सनी निम्हण, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, नगरसेविका भक्ती गायकवाड, नगरसेविका सपना छाजेड, रिपाइं शिवाजीनगर अध्यक्ष अविनाश कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.